**महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांची पत्रकार परिषद**

प्रकाशगड, दि. २६ जून २०२५

1. महावितरणने पंचवार्षिक वीज दर याचिका महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केली त्यावेळी कंपनीने राज्याच्या इतिहासात प्रथमच घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांसाठीच्या वीजदरात कपात करण्याची अनुमती मागितली होती.
2. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. 25 जून रोजी आदेश दिला असून घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक व कृषी अशा सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांसाठीच्या वीज दरात कपात करण्याचा आदेश दिला आहे.
3. राज्यातील वीज ग्राहकांच्या वीजदरात 1 जुलै 2025 पासून तातडीने कपात लागू होणार आहे. चालू आर्थिक वर्षातच सर्व घटकांसाठीच्या वीजदरात कपात होईल. पुढील पाच वर्षात 2029 -30 पर्यंत प्रत्येक वर्षी वीजदरात घट होत जाणार आहे.
4. विविध वीज ग्राहकांच्या वर्गवारीनुसार दरात कशी घट होणार आहे, हे आयोगाच्या आदेशामध्ये स्पष्ट होत आहे. त्याचे टेबल माहितीसाठी सोबत दिले आहे.
5. घरगुती वीज ग्राहकांमध्ये महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण 70 टक्के आहे, त्यांच्यासाठीच्या वीजदरात यावर्षी 10 टक्के घट होणार आहे तर पाच वर्षांच्या अखेरीस ही घट 26 टक्क्यांवर पोहोचलेली असेल. शंभर ते तीनशे युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच्या दरात टप्प्या टप्प्याने पाच वर्षात 4.61 टक्के घट होईल.
6. स्वातंत्र्य मिळाल्यापासून 2022 पर्यंत राज्याची विजेची कमाल क्षमता 36 हजार मेगावॅट होती. राज्याला आगामी काळात किती विजेची गरज पडेल हे ध्यानात घेऊन महावितरणने गेल्या दोन वर्षात 45 हजार मेगावॅट वीज खरेदीचे करार केले, त्यामध्ये सौर, पवन, बॅटरी स्टोरेज, पंप स्टोरेज अशा नवीकरणीय ऊर्जेचा वाटा 36 हजार मेगावॅट आहे. महावितरणला नवीकरणीय वीज स्वस्तात मिळणार आहे. त्यामुळे आगामी पाच वर्षात महावितरणचे वीज खरेदीचे 66 हजार कोटी रुपये वाचणार आहेत. महावितरणच्या महसुलातील 85 टक्के रक्कम ही वीज खरेदी आणि विजेचे उपकेंद्रापर्यंत वहन करण्यासाठी खर्च होते. खरेदी खर्चात मोठी बचत झाल्यामुळे महावितरण आपल्या ग्राहकांना फायदा करून देऊ शकली आहे.
7. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 ही 16 हजार मेगावॅट क्षमतेची सौर ऊर्जा निर्मिती योजना महावितरण राबवत आहे. हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. या योजनेतून महावितरणला सरासरी तीन रुपये युनिट इतक्या कमी दराने वीज मिळणार आहे.

शेतकऱ्यांना लाभ होण्यासोबतच महावितरणच्या वीज खरेदी खर्चात बचत करणारी ही गेमचेंजर योजना आहे.

8. महावितरणचा सरासरी वीज पुरवठा दर अर्थात ग्राहकांच्या दारापर्यंत वीज पोहचविण्याचा सध्याचा सरासरी दर 9 रुपये 45 पैसे आहे. तो आगामी पाच वर्षात दरवर्षी कमी होऊन 8 रुपये 57 पैसे होईल. जर महावितरणने वीज खरेदी खर्चात बचत करण्याची नवीन उपाय योजना केली नसती आणि पारंपरिक पद्धतीने वीजखरेदी केली असती तर हा सरासरी दर 14 रुपये 67 पैसे या पातळीवर पोहोचला असता. अर्थात 6 रुपये 10 पैसे प्रति युनिट बचत होणार आहे.
9. राज्यातील औद्योगिक ग्राहकांसाठीचा सध्याचा वीजदर 10 रुपये 88 पैसे प्रती युनिट दर आहे हा विजेचा दर पारंपरिक पद्धती चालू राहिली असती तर पाच वर्षात 15 रुपये 77 पैसे या पातळीवर पोहोचला असता पण कंपनीने रिन्युएबल एनर्जीवर भर दिल्यामुळे बचत होऊन उद्योगांचा वीज दर पाच वर्षात 9 रुपये 97 पैसे या पातळीवर कमी झालेला असेल. पारंपरिक स्थितीशी तुलना करता औद्योगिक ग्राहकांचा वीजदरात पाच वर्षात 37 टक्के लाभ होणार आहे.
10. व्यावसायिक ग्राहकांसाठीचा दरही सध्याच्या 16.97 रुपये प्रति युनिटवरून पाच वर्षात 23.91 रुपये प्रती युनिट दरावर पोहोचला असता पण आता तो 15.87 रुपये असेल. पारंपरिक स्थितीशी तुलना करता व्यावसायिक ग्राहकांचा वीजदरात पाच वर्षात 34 टक्के लाभ होणार आहे.
11. महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सध्याचा दर 8.14 रुपये प्रती युनिट आहे, तो पाच वर्षात 11.32 रुपये प्रती युनिटवर पोहोचला असता पण तो आता 6 रुपये प्रति युनिटपर्यंत खाली येईल. पारंपरिक स्थितीशी तुलना करता व्यावसायिक ग्राहकांचा वीजदरात पाच वर्षात 47 टक्के लाभ होणार आहे.
12. महिना शंभर ते तीनशे युनिटपर्यंत वीज वापणाऱ्या ग्राहकांसाठीचा सध्याचा दर 13.23 रुपये प्रती युनिट आहे तो पारंपरिक पद्धतीने पाच वर्षात 22 रुपये 34 पैसे प्रती युनिट या पातळीवर पोहोचला असता. पण हा दर आता पाच वर्षात 12 रुपये 62 पैसे या पातळीवर घसरलेला असेल.
13. शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केली असून त्या अंतर्गत साडेसात एचपीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज मिळते. तथापि, शेतकऱ्यांसाठीच्या वीजदरातही किती कपात होणार आहे हे माहितीसाठी महत्त्वाचे आहे. सध्याचा कृषीचा वीजदर 5 रुपये 36 पैसे प्रती युनिट आहे तो दर पारंपरिक पद्धतीने 10 रुपये 24 पैसे प्रती युनिटवर पोहोचला असता पण पाच वर्षांच्या अखेरीस तो 3 रुपये 83 पैसे प्रती युनिट या पातळीवर पोहोचेल.

14. वीज कधी वापरली त्यानुसार वीजदर निश्चित करण्याला टीओडी म्हणतात. आतापर्यंत घरगुती ग्राहकांना ही सुविधा नव्हती. पण आता घरगुती ग्राहकांनाही सदर सवलत मिळणार आहे. सकाळी 9 ते सायंकाळी पाचपर्यंत वापरलेल्या विजेच्या दरात घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी अतिरिक्त ऐंशी पैसे प्रति युनिट सूट मिळणार आहे. ही सवलत मिळण्यासाठी घरगुती ग्राहकांकडे स्मार्ट मीटर असणे गरजेचे आहे. महावितरणतर्फे ग्राहकांना मोफत स्मार्ट मीटर देण्यात येत आहेत. ही सवलत 1 जुलैपासूनच सुरू होणार आहे.